# प्रेस नोट

## नवी मुंबई सायबर सेल गुन्हे शाखा पोलीसांकडुन तरूणीचा फोटो, व्हिडीओ मॉर्फ करून व्हायरल करणा—या आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघड

पिडीत तरूणीचा मोबाईल नंबर व फोटोचा वापर करून तिचे नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून त्यावर मॉर्फ केलेले तरूणीचे अश्लिल फोटो, व्हिडीओ, मेसेज टाकुन बदनामी केल्याचा प्रकार घडला होता. विशेष म्हणजे मॉर्फ केलेले फोटो, व्हिडीओ आणि मेसेजेस तरूणीच्या ख—या इन्स्टाग्राम अकाउंटमधील १०६ मित्र—मैत्रिणी यांना पाठविण्यात आल्याचे तरूणीचे लक्षात आले. तरूणीची बदनामी करण्याच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तिने हा प्रकार केल्याचे तरूणीचे लक्षात आल्यानंतर सदर तरूणीने अज्ञात इसमाविरूध्द कळंबोली पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.२५३/२०२१ भादंवि कलम २९४(१),५०० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७, ६७(बी) अन्वये गुन्हा दाखल केला.

**“महिला व बालक यांचेवरील अत्याचाराबाबत दाखल सायबर गुन्हे उघडकीस आणणे”** याबाबत मा.पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे आणि मा. पोलीस उपआयुक्त, गुन्हे यांनी वेळोवेळी सर्व पोलीस ठाणे व गुन्हे शाखा यांना आदेशित केले होते.

उपरोक्त गुन्हयाचा समांतर तपास नवी मुंबई सायबर सेल गुन्हे शाखेच्या पथकाने आधुनिक तंत्रज्ञान व तांत्रिक कौशल्याचा वापर करून गुन्हा करणारा आरोपी अजय देवलाल शिंगणे, वय—२० वर्षे यास निष्पन्न केले.निष्पन्न केलेला सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरूध्द कामोठे पोलीस ठाणे येथे अग्निशस्त्राचा धाक दाखवुन जबरी चोरी (रॉबरी) व चैन स्नॅचिंग केल्याचे ०२ गुन्हे दाखल असुन त्या गुन्हयात तो अटक होता. सदरचा आरोपी आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याने तो सदर गुन्हयाच्या तपासात मिळुन येत नव्हता. सदर पथकने आरोपी संबंधी मिळालेल्या तांत्रिक माहितीचा बारकाईने अभ्यास करून आरोपीचा मुळ राहत असलेल्या ठावठिकाणाचा पत्ता मिळवुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. सदरचा गुन्हा त्यांने केले असल्याचे त्याचेविरूध्द तांत्रिक सबळ पुरावे प्राप्त झाल्याने त्यास कळंबोली पोलीस ठाणे यांचे मदतीने उपरोक्त गुन्हयात दिनांक १५/०९/२०२१ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

महिला व बालक यांचेवरील अत्याचाराबाबत दाखल असलेला सायबर गुन्हा मा.पोलीस आयुक्त, मा.पोलीस सह आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. पोलीस उपआयुक्त, गुन्हे आणि मा. सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर सेल वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक विजय उपाळे, पोहवा/चौगुले, मपोना/पाटील, मपोशि/गडगे, पोशि/दाभाडे व पोना/कारखेले यांनी उघडकीस आणला आहे.

नवी मुंबई पोलीस यांचेकडुन सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, महिला व बालक यांचेबाबत सायबर क्राईम संबंधी तक्रारी असल्यास स्थानिक पोलीस ठाणे/सायबर सेल येथे तात्काळ संपर्क करावा.

,,,